'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

## 'युवा संवाद - इंडिया @ 2047' या कार्यक्रमाकरिता चहा-बिस्कीट, नाश्ता व भोजन पुरविणेसाठी निविदा सूचना

कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव येथे दि. 22/07/2023 रोजी **'युवा संवाद - इंडिया @ 2047'** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर कार्यक्रमासाठी नमुद दिनांकास चहा-बिस्कीट, नाश्ता व भोजन पुरविणेसाठी नोंदणीकृत भोजन पुरवठादारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. संपूर्ण अटी व शर्तीसह निविदा माहितीपत्रक विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**टिप:** 1) भोजन निविदा डाऊनलोड करण्यासाठी दि.27/06/2023 ते दि. 17/07/2023 या कालावधीत सायं. 5.00 वाजेपर्यंत उपलब्ध आहेत.

2) भरलेल्या सिलबंद निविदा दि. 17/07/2023 सायं. 5.00 वाजेपर्यंत विद्यापीठ कार्यालयात जमा करावयाच्या आहेत.

जा.क्र.कबचौउमवि/14-क/रासेयो/निविदा/348/2023 **(डॉ. विनोद प्र. पाटील)**
दि. 27/06/2023 **कुलसचिव**

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle)

उमविनगर, जळगाव-425001 (महाराष्ट्र)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

☎: (91) 0257-2257349-350, Fax No. 91 (0257) 2258403, 406 ● Website: www.nmu.ac.in ● e-mail: nss@nmu.ac.in

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

जा.क्र.कबचौउमवि/14-क/निविदा सुचना/348/2023 दि. 27/06/2023

### चहा, नाश्ता व भोजन व्यवस्था समिती युवा संवाद - इंडिया @ 2047

## -० निविदा सूचना ०-

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव येथे **दि. 22/07/2023 रोजी आयोजित 'युवा संवाद - इंडिया @ 2047'** या कार्यक्रमासाठी चहा-बिस्कीट, नाश्ता व भोजन आदी केटरींग व्यवस्था पुरविण्याकामी पुरवठादार यांचे कडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा धारकांनी खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेल्या मेनुप्रमाणे प्रति प्लेट संख्येचे दर नमुद करुन सिलबंद पाकिटावर **'युवा संवाद - इंडिया @ 2047 केटरिंग दरपत्रक'** असा उल्लेख करावा.

➤ **चहा-बिस्कीट, नाश्ता व भोजनाबातचा मेनु:**

| अ. क्र. | दिनांक व वार | मेनुबाबतचा तपशिल | प्लेट संख्या अंदाजित |
|---|---|---|---|
| 1) | **शुक्रवार दि.21/07/2023** | **रात्रीचे भोजन:** शेवभाजी, भाकरी, चपाती, जिरा राईस, कांदा, लिंबु, पापड, लोणचे व पिण्यासाठी मिनरल वॉटर | 300 व्यक्ती |
| 2) | **शनिवार दि.22/07/2023** | **अल्पोपहार (नाश्ता):** उपमा (बारीक शेव व लिंबुसह) व चहा | 1500 व्यक्ती |
| 3) | **शनिवार दि.22/07/2023** | **दूपारचे भोजन:** फोडणीचे वरण, भात, मटकी पातळ भाजी, मिक्स व्हेज (कोरडी भाजी), साधी व मसाला पुरी, चपाती, खोबरा बर्फी,/मोहनथाल कांदा, लिंबु, डिस्को पापड, सलाड व पिण्यासाठी मिनरल वॉटर | 1500 व्यक्ती |
| 4) | **शनिवार दि.22/07/2023** | **दूपारी चहा व बिस्कीट** | 1500 व्यक्ती |
| 5) | **शनिवार दि.22/07/2023** | **रात्रीचे भोजन:** कढी, खिचडी, कांदा, लिंबु, डिस्को पापड, सलाड व पिण्यासाठी मिनरल वॉटर | 300 व्यक्ती |

✓ **दरपत्रके सादर करण्यासाठी आवश्यक असलेल्या अटी व शर्तींची माहिती खालीलप्रमाणे:**

1) कोऱ्या निविदा, अटी व शर्तीसह विद्यापीठाच्या **www.nmu.ac.in** या संकेतस्थळावर डाऊनलोड करण्यासाठी दि. 27/06/2023 पासून उपलब्ध आहेत.
2) या निविदा सुचनेत सहभागी होण्यासाठी अधिकृत नोंदणी असलेल्या पुरवठादारांचीच दरपत्रके स्विकारली जातील. त्यासाठी दरपत्रकासोबत शॉप ॲक्ट रजिष्ट्रेशनची/संस्थेची नोंदणी दाखल्याची छायांकित सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.
3) पुरवठादाराने अन्न व औषध प्रशासन यांचेकडील परवान्याची प्रत जोडणी आवश्यक आहे.
4) पुरवठादाराने PAN CARD ची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.
5) पुरवठादाराने GST प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडणी आवश्यक आहे. **(आवश्यक असल्यास)**
6) दरपत्रकात नमुद करावयाचे दर हे सर्व करांसह (GST सह) नमुद करण्यात यावेत. त्यासाठी स्वतंत्रपणे सिलबंद पाकीटात लेटरहेडवर सही, शिक्क्यानिशी दर नमुद करून सादर करावेत.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र ... जळगाव-४२५००१

(पा.क्र.२)

7) सशर्थ निविदा स्विकारली जाणार नाही.
8) चहा-बिस्कीट, नाश्ता व भोजन व्यवस्था ही वेगवेगळ्या ठिकाणी करावयाची असून त्यासाठी भोजन समिती सांगेल त्या ठिकाणी व्यवस्था करणे पुरवठादारास बंधनकारक राहील.
9) चहा-बिस्कीट, नाश्ता व भोजन व्यवस्थेसाठी लागणारे साहित्य स्वखर्चाने विद्यापीठाच्या परिसरात आणून व्यवस्था करावी लागेल.
10) कार्यक्रमाच्या स्थळी विद्यापीठ परिसरातील कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास संबंधित पुरवठादाराकडून वसुली करण्यात येईल.
11) कार्यक्रमाच्या ठिकाणी स्वच्छता राखणे व स्वच्छता करून देणे आवश्यक राहिल.
12) शिल्लक राहिले खरकटे अन्न, इतर अनावश्यक पदार्थांची विद्यापीठ वसतीगृहातील जैविक कचरा मशीन्स मध्ये विल्हेवाट लावणे पुरवठादारा बंधनकारक राहिल.
13) स्वयंपाकासाठी लागणारी भांडी, इतर साहित्य, वाढपी, नोकरवर्ग यांची व्यवस्था पुरवठादाराने स्वत: करावी लागेल.
14) भोजन तयार करण्यासाठी व्यावसायिक गॅस सिलेंडरचा वापर करणे आवश्यक राहील.
15) उपरोक्त व्यवस्थे कामी बाल कामगार नेमण्यात येऊ नयेत.
16) कार्यक्रमासाठी वापरण्यात येणाऱ्या गॅस यंत्रणेची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील. स्वयंपाकाच्या ठिकाणी काही दुर्घटना घडल्यास होणाऱ्या संपुर्ण नुकसानीची जबाबदारी पुरवठादाराची राहिल.
17) पुरवठादारास उपरोक्त प्रमाणे नमुद कामासाठी कोणतीही अग्रीम रक्कम दिली जाणार नाही. काम पुर्ण झाल्यानंतर पुरवठादारास TDS रक्कम कपात करून देयकाची अदायगी करण्यात येईल.
18) स्वयंपाकासाठी लागणारे मंडप, पाणी, वीज व अन्न वाटपासाठी लागणारे स्टॉलचे टेबल्स इ.व्यवस्था विद्यापीठामार्फत करण्यात येईल. मात्र स्वयंपाकासाठी लागणारे संपुर्ण साहित्य भांडे, प्लेट, वाटी, चमचे, टिश्यु पेपर, ग्लास, डस्टबीन व तत्सम साहित्य आदीची व्यवस्था पुरवठादारास करणे आवश्यक राहिल.
19) देयक सादर करताना विद्यापीठाचा **GST No. 27AAAJN0465A1ZL** चा उल्लेख करूनच पक्के बील द्यावे लागेल. बिलातील GST ची रक्कम शासनाकडे भरणा केल्याचा पुरावा सादर करणे आवश्यक राहिल. तद्नंतरच भोजन समितीच्या अध्यक्षांनी शिफारस केल्यानंतर देयकाची अदायगी साधारण 15 दिवसानंतर करण्यात येईल.
20) पुरवठादाराने भोजना करिता सर्व वस्तु (किराणा माल) उच्च प्रतीच्या दर्जाच्या खरेदी कराव्यात. त्यासाठी शुध्द सोयाबीन तेल वापरण्यात यावे.
21) पिण्यासाठी थंड मिनरल वॉटरचा पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक राहील.
22) भोजना करिता वापरण्यात येणारे दुध, अन्नधान्य-किराणा माल, भाजीपाला तसेच तयार केलेले अन्नपदार्थ यांच्या दर्जाबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास अन्न व औषध प्रशासन विभागाकडून मालाचा दर्जा तपासण्यात येईल. भोजन पदार्थ तपासणीचा खर्च हा नियमानुसार पुरवठादार यांनी करणे बंधनकारक राहिल. भोजन पदार्थांच्या दर्जाबाबत तपासणीअंती तथ्य आढळून आल्यास संबंधितावर प्रचलित कायद्यातील तरतुदींनुसार कारवाई करण्यात येईल व पुरवठा आदेश तात्काळ रद्द करून काळ्या यादीत समाविष्ट करण्यात येईल.
23) निविदाधारक हे शासकीय कार्यालयात, विद्यापीठात अथवा शासन मान्य अनुदान घेणाऱ्या संस्थांच्या पुरवठादारांच्या काळ्या यादीत (Black Listed) समाविष्ट नसल्याबाबतचे रुपये 200/- च्या स्टॅंप पेपरवरील विहीत नमुन्यातील प्रपत्र-3 अन्वये शपथपत्र सादर करणे आवश्यक राहील.
24) प्रसिद्ध केलेल्या निविदा सुचनेतील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत तसेच प्रपत्र-4 मधील दरांचा भाग हा शासकीय कार्यालयात, विद्यापीठात अथवा शासन मान्य अनुदान घेणाऱ्या संस्था यांना आकारल्या जाणाऱ्या दरांपेक्षा अधिक नसल्याबाबत जाहिरनामा लिहून देणे पुरवठादारास आवश्यक राहील.

25) प्रपत्र-1 ते प्रपत्र-4 च्या परिपूर्ण भरलेल्या तांत्रिक भागातील (Technical Documents) कागदपत्रांच्या प्रति स्वतंत्रपणे मोठ्या आकाराच्या (A4 Size) पाकिटात व प्रपत्र-5 व्यापारी लिफाफा (Price Bid) हे स्वतंत्रपणे सिलबंद पाकिटात सादर करणे पुरवठादारास आवश्यक राहील.

26) विद्यापीठ हित लक्षात घेऊन, सदरच्या निविदा सुचनेतील एखादी अट शिथील करण्याचा व अर्थ लावण्याचा तसेच पुर्णत: अथवा अंशत: मंजुर करण्याचा तसेच कोणतेही कारण न दर्शविता निविदा स्विकारण्याचा, फेटाळण्याचा, वरील सर्व अटींमध्ये संपुर्णत: किंवा अंशत: बदल करण्याचा वा नाकारण्याचा तथा वाटाघाटीअंती योग्य पुरवठादारास कार्यादेश देण्याचा संपुर्ण अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

27) अंतीम वाटाघाटीसाठी पुरवठादारास विद्यापीठात समितीशी चर्चा करण्यासाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

28) किमान तिन निविदा प्राप्त न झाल्यास निविदेस पुन्हा मुदतवाढ देण्यात येईल. प्राप्त निविदा संपूर्ण अथवा अंशत: नाकारणे किंवा पुन्हा मागविणे याबाबतचे सर्व अधिकार कुलसचिव यांनी राखून ठेवलेले आहेत.

29) निविदेसोबत पुरवठादाराने निविदा **नापरतावा शुल्क म्हणून रुपये 1600/- मात्र डी. डी. वित्त व लेखाधिकारी, कबचौउमवि, जळगांव** या नांवे जोडणे बंधनकारक राहील.

30) पुरवठादार यांना **बयाणा रक्कम (EMD) म्हणून रुपये 8000 मात्र एवढ्या रकमेचा डी. डी. (धनाकर्ष) वित्त व लेखाधिकारी, कबचौउमवि, जळगांव यांचे नांवे** जमा करणे आवश्यक राहील.

31) L1 ठरलेले पुरवठादार यांना कार्यादेश देतेवेळी त्यांचेकडून कार्यादेशाच्या 5% मात्र एवढी रक्कम **सुरक्षा अनामत (Security Deposit) म्हणून ऑनलाईन स्वरुपात किंवा डी. डी. (धनाकर्ष) द्वारे जमा करणे बंधनकारक राहील.** सुरक्षा अनामत रक्कम जमा केल्याशिवाय कार्यादेश दिला जाणार नाही व सुरक्षा अनामत रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

32) L1 ठरलेल्या पुरवठादारांनी सेवा पुरविण्यास नकार दिल्यास अथवा कोणत्याही टप्प्यावर माघार घेतल्यास L2 ठरलेले पुरवठादार यांना कार्यादेश देण्यात येईल व सदरची व्यवस्था करणे त्यांना बंधनकारक राहील.

33) सिलबंद पाकीटावर **'युवा संवाद - इंडिया @ 2047 चहा, नाश्ता व भोजन केटरिंग निविदा'** असा स्पष्ट उल्लेख असावा.

34) **विवाद (Disputes) व कार्यक्षम (Jurisdiction):** चहा, नाश्ता व भोजन पुरवठ्याच्या निविदेबाबत निविदाधारक व विद्यापीठ यांच्यात कुठल्याही स्वरुपाचा वाद निर्माण झाल्यास मा. कुलगुरु यांनी दिलेला निर्णय हा अंतिम व दोन्ही वादी तथा प्रतिवादी पक्षांवर बंधनकारक राहील.

35) सदरची सिलबंद निविदा मा. अध्यक्ष भोजन समिती, **'युवा संवाद - इंडिया @ 2047'**, द्वारा राष्ट्रीय सेवा योजना विभाग, कबचौउमवि, जळगाव यांच्याकडे दि.17.07.2023 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी सादर करण्यात यावेत.

**डॉ. विनोद प्र. पाटील**
कुलसचिव
कबचौउमवि, जळगांव

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव-४२५००१

# प्रपत्र - 1

## निविदाधारकारक यांचा वार्षिक उलाढाली बाबत सनादी लेखापाल यांचा दाखला
(Chartered Accountant)

प्रमाणित करण्यात येते की, ---------------------------------------------------------------------- यांच्या खालील नमूद केलेल्या बँक खत्यांच्या तपशिल आणि वार्षिक ताळेबंद आमच्या मार्फत तपासण्यात आलेला असून, त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांचा वार्षिक उलाढालीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | खातेदाराचे / निविदाधारकाचे नांव | बँकेचे नांव, शाखा व खातेदाराचा खातेक्रमांक | आर्थिक उलाढालीचे वर्ष | एकुण वार्षिक उलाढाल रक्कम |
|---|---|---|---|---|
| | | | सन 2019-2020 | |
| | | | सन 2020-2021 | |
| | | | सन 2021-2022 | |

सनदी लेखापालाची स्वाक्षरी,
शिक्का व संपर्क क्रमांक

ठिकाण:

दिनांक / /2023

(पा.क्र.४)

# <u>प्रपत्र - 2</u>

## पात्रतेविषयी निविदेसोबत जोडावयाच्या दस्तऐवजांची यादी

| तपशिल | कागदपत्रे सादर केलेली आहेत किंवा कसे ? होय / नाही |
|---|---|
| निविदाधारकाचे संपूर्ण नांव: | |
| निविदाधारकाचा संपूर्ण पत्ता: | |
| | |
| दुरध्वनी क्रमांक / मोबाईल क्रमांक | कार्यालय दुरध्वनी क्रमांक: |
| | मोबाईल क्रमांक: |
| ई-मेल आयडी | |
| बयाणा रक्कम रुपये | |
| व्यवसायकर निपटारा प्रमाणपत्र | |
| पॅन कार्ड (PAN Card) | |
| वस्तु व सेवा कर अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र (GST नोंदणी) | |
| संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र (दुकाने व संस्था अधिनियम 1948 अन्वये अथवा ग्रामपंचायत) | |
| संस्था नोंदणी अधिनियम 1950 किंवा 1860 (बचत गट नोंदणी सक्षम प्राधिकारी प्रमाणपत्र सुट लागू असल्यास) | |
| Udyog Aadhaar चे नोंदणी प्रमाणपत्र (निविदा फॉर्म फी व बयाणा रकमेतुन सुट लागु असल्यास) | |
| अन्न व औषध प्रशासन यांचे कडील नोंदणी प्रमाणपत्र | |
| सनदी लेखापाल यांचे वार्षिक उलाढाल संबंधीचे प्रमाणपत्र | |
| संबंधित उत्पादनाचे प्राधिकार पत्र (लागू असल्यास) | |
| आयकर भरणा विवरणपत्र (A.Y. 2019-2020, 2020-2021, 2021-2022) प्रपत्र-1 प्रमाणे | |
| पात्रतेविषयी निविदेसोबत जोडावयाच्या दस्तऐवजांची यादी प्रपत्र-2 प्रमाणे | |
| निविदाधारक काळ्या यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे शपथपत्र प्रपत्र-3 प्रमाणे | |
| निविदाधारकाचा जाहिरनामा प्रपत्र-4 पमाणे | |
| व्यापारी लिफाफा (BOQ) प्रपत्र-5 प्रमाणे स्वतंत्र सिलबंद पाकिटात | |
| संस्था / बचत गटाच्या नांवे असलेले बॅक खात्याचे पास बुक प्रत जोडली आहे काय ? | |
| सरकारी /निमसरकारी/विद्यापीठ/नामांकित खाजगी संस्थांमार्फत निर्गमित अनुभवाचे प्रमाणपत्र | |
| अधिकृत प्रतिनिधींसाठीचे प्राधिकार पत्र (आवश्यक असल्यास) | |
| **सदरचे प्रपत्र निविदा सोबत स्वाक्षरीने प्रमाणीत करुन सादर करणे बंधनकारक राहील.** | |

<u>टिप</u>: 1) जोडलेल्या दस्तऐवजांसाठी (✓) अशी खुण करावी 2) ठेकेदाराने या निविदेसोबत उपरोक्तप्रमाणे कागदपत्रांच्या छायांकित साक्षांकित प्रती जोडाव्यात. 3) या कागदपत्रांच्या मुळ प्रती निविदा उघडण्याच्या वेळी / तपासणीच्या वेळी विद्यापीठास उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव-४२५००१

**निविदाधारकाची स्वाक्षरी, नांव व शिक्का**

(पा.क्र.५)

(प्रपत्र- ३)

## निविदाधारक पुरवठादारांच्या काळ्या यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे शपथपत्र

(Public Notary/Executive Magistrate यांचे स्वाक्षरीसह रु २०० च्या न्यायिक स्टॅम्पवर नोटरी करून सादर करणे आवश्यक आहे.)

मी /आम्ही ---------------------------------------------------------- चे उत्पादन/भागीदार

(अधिकृत)/वितरक------------------------------------------------------------------------

करतो / करते की, विद्यापीठाद्धारा प्रसिध्द निविदा संदर्भ क्र. कबचौउमवि/ / /२०२३, दि. अन्वये प्रसिध्द निविदेत आम्ही सहभाग घेतलेला असून आमच्या --------------------------- फर्म/कंपनीला पुर्वी भारतातील अथवा महाराष्ट्र राज्यातील निविदांमध्ये भाग घेण्यापासून युनियन / शासन /इतर संस्थेने काळया सुचित समाविष्ट केलेले नाही किंवा बंदी घातलेली नाही . तसेच आमच्या फर्मचे/कंपनीचे कोणत्याही निविदेमध्ये सुरक्षा अनामत/बयाणा रक्कम ही जप्तीची कार्यवाही यापुर्वी कोणत्याही निविदा प्रक्रियेमध्ये करण्यात आलेली नाही,असे याद्वारे शपथपत्रावर लिहून देत आहे.

ही माहिती खोटी आढळल्यास आम्हाला पुर्ण माहिती आहे की निविदा नियंत्रक / विद्यापीठामार्फत आमची निविदा रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल, याची मला/आम्हाला जाणीव आहे. तसेच सुरक्षा रक्कम व बयाणा रक्कम जप्त करण्याची कार्यवाही करेल ही बाब आम्हाला मान्य आहे.

निविदा धारकाची नाव व सही व पत्ता

साक्षांकीत

(Public Notary/Executive Magistrate)

13

(पा.क्र.६)

निविदाधारकाने स्वतःच्या कंपनीच्या/फर्मच्या नावे असलेल्या लेटरहेडवर सदरचा मजकुर छपाई करून द्यावयाचा आहे.

---

(प्रपत्र-४)

Bidders Declaration निविदाधारकाचा जाहिरनामा

मी याव्दारे प्रामाणित करतो की, मी निविदा दस्तऐवजांत नमुद केलेल्या सर्व माहिती, अटी व शर्ती पुर्ण केल्या आहेत. आणि त्याव्दारे पालन करण्याची पुष्टी करतो. मी याव्दारे प्रमाणित करतो की, आर्थिक/व्यवसायिक बोली ही प्रपत्र-५ मधील (Price Bid- BOQ) मध्ये नमुद केलेले दर इतर कोणत्याही शासन/संस्था/विभाग/संस्थेला आकारल्या जाणाऱ्या दरापेक्षा अधिक नाहीत असा जाहिरनामा लिहून देत आहे.

सही --------------------------------

स्वाक्षरीकर्त्याचे नाव --------------------------------

निविदाधारकाचे शिक्का

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव-४२५००१

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
उमविनगर, जळगाव-425001 (महाराष्ट्र)
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
☎: (91) 0257-2257349-350, Fax No. 91 (0257) 2258403, 406 ● Website: www.nmu.ac.in ● e-mail: nss@nmu.ac.in

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**चहा, नाश्ता व भोजन व्यवस्था समिती युवा संवाद - इंडिया @ 2047**
**या कार्यक्रमासाठी सहभागी प्रतिनिधी व इतर मान्यवर यांचेसाठीचा चहा-बिस्कीट, नाश्ता व भोजनासंबंधीच्या मेनु प्रमाणे खालील प्रमाणे दर सादर करीत आहे.**

## व्यापारी लिफाफा (BOQ) प्रपत्र-5

1) निनिदाधारकाचे नांव व पत्ता: ______________________________

2) **चहा-बिस्कीट, नाश्ता व भोजन पुरविण्याचे दर** जा.क्र.कबचौउमवि/14-क/निविदा सुचना/348/2023 दि. 27/06/2023 अन्वये सादर करीत आहोत.

✓ **चहा-बिस्कीट, नाश्ता व भोजनाबातचा मेनु:**

| अ. क्र. | दिनांक व वार | मेनुबाबतचा तपशिल | प्लेट संख्या अंदाजित | किंमत प्रति प्लेट प्रति व्यक्ती |
|---|---|---|---|---|
| 1) | शुक्रवार दि.21/07/2023 | **रात्रीचे भोजन:** शेवभाजी, भाकरी, चपाती, जिरा राईस, कांदा, लिंबु, पापड, लोणचे व पिण्यासाठी मिनरल वॉटर | 300 व्यक्ती | |
| 2) | शनिवार दि.22/07/2023 | **अल्पोपहार (नाश्ता):** उपमा (बारीक शेव व लिंबुसह) व चहा | 1500 व्यक्ती | |
| 3) | शनिवार दि.22/07/2023 | **दूपारचे भोजन:** फोडणीचे वरण, भात, मटकी पातळ भाजी, मिक्स व्हेज (कोरडी भाजी), साधी व मसाला पुरी, चपाती, खोबरा बर्फी,/मोहनथाल कांदा, लिंबु, डिस्को पापड, सलाड व पिण्यासाठी मिनरल वॉटर | 1500 व्यक्ती | |
| 4) | शनिवार दि.22/07/2023 | **दूपारी चहा व बिस्कीट** | 1500 व्यक्ती | |
| 5) | शनिवार दि.22/07/2023 | **रात्रीचे भोजन:** कढी, खिचडी, कांदा, लिंबु, डिस्को पापड, सलाड व पिण्यासाठी मिनरल वॉटर | 300 व्यक्ती | |

**टिप:** पुरवठादारास जेवणासोबत सलाड (कांदा, लिंबु, बीट, काकडी, गाजर), लोणचे व पापड (उडीद/नागली/डिस्को पापड) पुरविणे बंधनकारक राहील तसेच पिण्यासाठी मिनरल वॉटरची स्टील/कागदी ग्लाससह व्यवस्था करणे आवश्यक राहील.

ठिकाण:

दिनांक:

**निविदाधारकाची सही**

नांव: ______________________

पत्ता: ______________________

(पा.क्र.८)